# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:09.07.2025** **वार:बुधवार**

---

•पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ब्राझील भेटीत महत्वाचे करार, शेवटच्या टप्प्यात पंतप्रधानांची आज नामीबिया भेट,

•घटनादुरुस्ती करून राज्य घटनेच्या मूळ गाभ्याला धक्का लावता येत नाही - सरन्यायाधीशांचं प्रतिपादन,

•महाराष्ट्रातील सहा औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचं आधुनिकीकरण करण्यासाठी परदेशी पतसंस्थांद्वारे १२० कोटींची गुंतवणूक,

•यंदाच्या आषाढीवारीत भाविक संख्येचा उच्चांक आणि

•राज्यात अनेक जिल्ह्यात मुसळधार पाऊस, जनजीवन विस्कळीत.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल ब्राझीलचे अध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांच्यासोबत प्रतिनिधीमंडळ स्तरावरील चर्चा केली. व्यापार, संरक्षण, ऊर्जा, अंतराळ, तंत्रज्ञान, शेती, आरोग्य आणि परस्पर संबंध याविषयी दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी वाढविण्यावर या चर्चेत भर देण्यात आला. यावेळी परस्पर हिताच्या तीन महत्वाच्या करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. 'ग्रँड कॉलर ऑफ द नॅशनल ऑर्डर ऑफ द सदर्न क्रॉस' हा ब्राझिलचा सर्वोच्च सन्मान मोदी यांना ब्राझीलच्या अध्यक्षांद्वारे प्रदान करण्यात आला.

दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात, आज पंतप्रधान नामिबियाला भेट देणार आहेत. नामिबियाचे अध्यक्ष नेतुम्बो नंदी-नदैतवाह यांच्याशी पंतप्रधान द्विपक्षीय चर्चा करतील. नामिबियाच्या संसदेत ते उपस्थितांना संबोधित करणार आहेत. या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदींना नामिबियाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. मोदी यांची

ही पहिलीच नामिबिया भेट आगामी भारत-आफ्रिका यांच्यातील शिखर परिषद आणि जागतिक दक्षिण प्राधान्यक्रमासाठी विशेष महत्वाची आहे.

**भूषणगवई**

“घटनादुरुस्ती करून राज्य घटनेच्या मूळ गाभ्याला धक्का लावता येत नाही,” असं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी काल मुंबईत विधानभवनात दिलेल्या व्याख्यानात केलं. युद्ध आणि संकटाच्या काळात भारतीय राज्यघटनेनं देशाला जोडून ठेवलं, असंही त्यांनी सांगितलं. “घटनेची मूलभूत तत्वं आणि मूलभूत अधिकार हे घटनेचा आत्मा असून या दोघांच्या एकत्रित विचारानं सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी काम केलं पाहिजे”, असं ते म्हणाले. यावेळी त्यांनी राज्यघटनेमागील डॉक्टर आंबेडकर यांची भूमिका उपस्थितांना समजावून सांगितली. यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार म्हणजे राज्यातल्या जनतेचा आशीर्वाद असल्याची प्रतिक्रिया सत्काराला उत्तर देताना गवई यांनी व्यक्त केली.

व्यापक जनहितासाठी गवई यांनी कायद्याचा वापर केला, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. प्रथमच सरन्यायाधीशांचा सत्कार विधान भवनात होत असल्याची प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली तर हा सत्कार ऐतिहासिक असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

**करार**

बंदरं आणि लॉजिस्टिक क्षेत्राला कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी कौशल्य विकास विभाग, बंदरे विभाग आणि अटल सोल्युशन यांच्यादरम्यान काल एक सामंजस्य करार करण्यात आला. त्यानुसार नेदरलँड्स, डेन्मार्क आणि पोलंडमधील पतसंस्था १२० कोटी रूपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात करणार आहेत. याअंतर्गत पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, बारामती, सिंधुदुर्ग, नागपूर आणि नाशिकमधील सहा निवडक ‘आयटीआय’ संस्थाचं आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. दरवर्षी ५००० ते ७००० विद्यार्थ्यांना सागरी वाहतूक, बंदर व्यवस्थापन क्षेत्रातील जागतिक दर्जाच्या कौशल्यांचं प्रशिक्षण मिळून रोजगार निर्मिती होण्यास मदत होणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या करारप्रसंगी बोलताना विधानभवनात सांगितलं. या करारामुळं राज्यातील तरुणांना वाढवण बंदरच नाही, तर इतर ठिकाणीही रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

**ग्रंथालय-महासंवाद**

ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्याच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव तातडीनं वित्त विभागाकडे पाठवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. विधानभवनात उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. राज्यातल्या अर्धशतक पार केलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांना प्रोत्साहनपर विशेष अनुदान मंजूर करायलाही मान्यता मिळाली आहे.

**गिग वर्कर्स**

राज्यातील खासगी खाद्यपदार्थ पुरवठा सेवा देणाऱ्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची म्हणजे गिग वर्कर्सची संख्या भविष्यात वाढणार असल्यानं, सरकार त्यांच्यासाठी स्वतंत्र कायदे निर्माण करणार असून, त्याच्या मसुद्यावर सध्या काम सुरु आहे आणि त्याद्वारे या कामगारांना सामाजिक सुरक्षितता देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, अशी माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिली. विधान परिषदेत विरोधी पक्षांनी, नियम २६० अन्वये मांडलेल्या ठरावाला ते उत्तर देत होते. राज्यात असंघटित कामगारांची संख्या वाढलेली असून, त्यांच्या कल्याणाकरता राज्यात ६८ व्हर्चुअल बोर्डची रचना प्रस्तावित आहे. त्यांची नोंदणी, सामाजिक सुरक्षा यांचा विचार करुन त्यांना न्याय देण्यासाठी काम सुरू असल्याची माहिती फुंडकर यांनी दिली.

**राज्यपाल**

अनुसूचित जातीतल्या अधिकाधिक विद्यार्थ्यांनी गुणवत्तेवर प्रवेश आणि नोकऱ्या मिळवण्याचा प्रयत्न करावा आणि आरक्षणाचा लाभ अनुसूचित जातीतल्या अधिक गरजू युवकांना घेऊ द्यावा, असं आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. ते काल मुंबईत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ८० व्या वर्धापन दिन सोहळ्यात बोलत होते. आरक्षण ही विकासाची किल्ली आहे, मात्र विद्यार्थी आणि युवकांनी आता जागतिक स्तरावर स्पर्धेसाठी तयार राहिलं पाहिजे, असं ते म्हणाले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २० व्यक्तींना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**वारकरीसंख्या**

यंदा आषाढीवारीतल्या गर्दीनं उच्चांक गाठला असून पंढरपुरात एकादशीच्या  दिवशी २७ लाखापेक्षा जास्त वारकरी दाखल झाल्याचं प्रशासनानं म्हटलं आहे. यंदा ड्रोनच्या माध्यमातून एआय प्रणालीव्दारे जमलेल्या गर्दीचं विश्लेषण करण्यात आलं, त्यात ही माहिती स्पष्ट झाली आहे. यंदा प्रथमच व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आल्यामुळे पदस्पर्श दर्शनाचा कालावधी किमान पाच ते सहा तासांनी कमी झाला.

**बेंदूर**

शेतकऱ्यांचा सण म्हणून ओळखला जाणाऱ्या बेंदूर सणाच्या पार्श्वभूमीवर सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागात उत्साहाचं वातावरण आहे. बैलांना सजवण्यासाठी आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिकांनी गेले दोन दिवस बाजारात गर्दी केली होती.

**घंटानाद**

लातूरमधील बनावट खतं विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाईच्या मागणीसाठी काल अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कृषी सहसंचालक कार्यालयात घंटानाद आंदोलन केलं आणि कृषी सहसंचालकांना निवेदन दिलं. दोन महिन्यापूर्वी निलंगा तालुक्यात बनावट खतांचा मोठा साठा छावा संघटनेनं प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला होता.

**राष्ट्रासाठी**

न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांमध्ये संवाद आणि सामंजस्यानं तडजोड साधण्यासाठी "राष्ट्रासाठी मध्यस्थी" ही विशेष मोहिम 1 जुलै ते 30 सप्टेंबर या कालावधीत सोलापूर जिल्हा न्यायालय आणि सर्व तालुका न्यायालयांमध्ये राबविण्यात येत आहे. याअंतर्गत विविध तडजोडयोग्य दिवाणी तसंच फौजदारी प्रकरणे जलद गतीनं निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**आयसर**

पुण्यातील आयसर संस्थेतील रसायनशास्त्र विभागात कार्यरत तीन प्राध्यापक सदस्यांना त्यांच्या संशोधन कामगिरीबद्दल केमिकल रिसर्च सोसायटी ऑफ इंडियाकडून पुरस्कार देण्यात आले. आयआयटी गांधीनगर इथं झालेल्या ३५व्या राष्ट्रीय रसायनशास्त्र परिसंवादादरम्यान हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**<u>पाऊस</u>**

राज्याच्या अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळं सामान्य जनजीवन विस्कळीत झालं आहे. गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज तालुक्यात काल १६८ मिलिमीटर तर कोरची तालुक्यात सुमारे १४५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. गोसेखुर्द धरणातून होणार पाण्याचा विसर्ग टप्प्याटप्प्यानं वाढवण्यात येणार आहे. त्यामुळं नदीकाठवरच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

भंडारा जिल्ह्यात कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळं पुराची शक्यता लक्षात घेत १८ रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. उजनी धरण सुमारे 87 टक्के भरलं आहे. पूर नियंत्रणासाठी उजनी धरणातून भिमा नदीत पाणी सोडण्याचा निर्णय उजनी धरण व्यवस्थापनानं घेतला आहे.

सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात जोरदार पाऊस पडत असल्यानं वारणा धरणातून वारणा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. पावसाचा जोर जास्त असल्यानं पाणी विसर्ग वाढवण्यात येणार असल्याचं वारणा धरण व्यवस्थापनाकडून सांगण्यात आलं आहे. कोयना धरणातूनही विसर्ग करण्यात येत आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात सध्या शेतीच्या कामांनी वेग घेतला आहे. भातपिकाच्या पुनर्लागवडीची कामं ठिकठिकाणी सुरू आहेत. सात जुलैपर्यंतच्या आकडेवारीनुसार, जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या सुमारे 37 टक्के पाऊस पडला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणच्या समुद्रात मासेमारीसाठी गेलेली लहान नौका उलटून तीन मासेमार पाण्यात फेकले गेले. यातील दोघेजण बचावले आहेत. बेपत्ता मासेमाराचा शोध सुरू आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी वीजांसह जोरदार पावसाची शक्यता आहे. कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहतील. मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस तर तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटाची  शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

## **आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**